मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# रील, गाणे, रॅपमधून करा मालमत्ताकर भरण्याचे आवाहन

## नागरिकांना कर भरण्याचे आवाहन करणारी करसंकलन विभागाची अभिनव स्पर्धा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या करसंकलन विभागाकडून नागरिकांनी वेळेत मालमत्ता कर भरण्यासाठी रील, गाणे व रॅपच्या माध्यमातून आवाहन करण्यात येणार आहे. यासाठी 'मी जबाबदार करदाता' रील-रॅप-गाणे बनवा या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.




मालमत्ताकर भरण्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती होण्यासाठी करसंकलन विभागाने लाखोंचे बक्षीस जाहीर केले आहे. जे रीलस्टार, संगीतकार, रॅपर असतील, अशांनी स्पर्धेमध्ये सहभागी होऊन आपल्या कलेच्या माध्यमातून नागरिकांना मालमत्ताकर भरण्याचे आवाहन करावे, असे कर आकारणी व कर संकलन विभागाकडून जाहीर करण्यात आले आहे.

महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत सध्या मालमत्ताकर वसूल करण्यासाठी थकबाकीदारांच्या मालमत्तांवर जप्तीची कारवाई सुरू असून थकबाकीदारांच्या थकीत रकमेवर प्रतिमहिना २ टक्क्यांचा विलंब दंडही वाढत आहे. त्याबरोबरच ज्या मालमत्ताधारकांनी आपल्या पाणीपट्टीचा भरणा केलेला नाही, अशा मालमत्तांचे नळकनेक्शन खंडित करण्याची कारवाईही सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेतील विजेत्यांना अनुक्रमे ५०, ३० आणि २० हजारांचे पारितोषिक आणि प्रशस्तीपत्रक देण्यात येणार आहे.

> चालू वर्षी सोशल मीडियाच्या माध्यमातून करसंकलन विभागाची सुरू असलेली मालमत्ताकराबाबत थकबाकी वसुली मोहीम व मालमत्ता जप्ती मोहिमेबाबत माहिती मिळावी व नागरिकांनी वेळेत कराचा भरणा करावा, यासाठी रील, गाणे व रॅप या अनोख्या स्पर्धेचे आयोजन केले आहे.
>
> **- अविनाश शिंदे, सहायक आयुक्त, करसंकलन विभाग, महानगरपालिका.**

### स्पर्धेत भाग घेण्यासाठी काय कराल...

1) रील, गाणे, रॅप व्हिडीओ स्वनिर्मित असावा. इतरांच्या व्हिडीओमधील कोणताही भाग घेऊ नये, तसेच कॉपीराईट कायद्याचे पालन करावे.

2) रील व्हिडीओ ओरिएन्टेशन पोर्टेट असावे.

3) रील व्हिडीओ ६० ते ९० सेकंदांचा असावा.

4) फेसबुक व इन्स्टाग्राम अथवा एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर तुमचे किमान दोन हजारांवर फॉलोअर्स असणे आवश्यक आहे.

5) रील्स स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी सर्वप्रथम नोंदणी करणे आवश्यक असून, नोंदणी फॉर्म मनपाच्या WWW.PCMCINDIA.GOV.IN संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

6) स्पर्धेचा कालावधी १ ते १५ फेब्रुवारी २०२५. स्पर्धकांनी १५ फेब्रुवारीपर्यंत आपले रील आपल्या आयडीवरून पोस्ट करून इन्स्टाग्रामवरील @PCMC_PIMPRICHINCHWAD या अकाउंटला कोलॅब करा. याबरोबर, फेसबुक व एक्स या व्यासपीठावर पोस्ट केल्यास आमच्या फेसबुक @PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION व एक्सच्या @PCMCINDIAGOVIN या सोशल मीडिया हँडलला टॅग करा.

7) आपल्या अकांउटवरून रील पोस्ट केल्यानंतर त्याची लिंक सदर PTAX@PCMCINDIA.GOV.IN या ईमेलवर मेल करावी.

8) आपण अपलोड केलेली रील, गाणे व रॅप यांचे दृश्य, आवाज स्पष्ट ऐकू व दिसेल, असा त्याचा दर्जा उत्तम असावा.

9) रील्समधून धर्म, जात, पंथ यांच्या उल्लेखाने सामाजिक वातावरणास तेढ निर्माण होईल, असे व सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होईल, असे चित्रण असलेले रील्स ग्राह्य धरले जाणार नाहीत. याबरोबरच कोणाच्याही भावना दुखावतील, असा आशय असलेले रीलही स्पर्धेतून बाहेर होतील.

10) रील्स स्पर्धेचा निकाल हा रील्सचे लाईक, दर्शकसंख्या (व्ह्यूव्ह्स), आशय, मांडणी, विषयाला दिलेला न्याय आदींवर ठरविला जाईल. स्पर्धेस निकालायोग्य प्रतिसाद आला नाही, तर स्पर्धा स्थगित करण्याचे स्वातंत्र्य आयोजकांकडे राहील.

11) रील्स स्पर्धेबाबत निर्णयप्रक्रिया, बदल, निवड आदीबाबतचे सर्व अधिकार पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडे राहतील.

12) रील हे मालमत्ताकराबाबत जनजागृतीसाठी असून त्याचा इतर कुठेही वापर करण्यात येणार नाही.

# निरंकारी सामूहिक विवाह समारोहामध्ये 93 जोडपी विवाहबद्ध

## निरंकारी संत समागमाची विधिवत सांगता झाल्यानंतर या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले

**पिंपरी | प्रतिनिधी**

निरंकारी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज व आदरणीय निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन सान्निध्यात सोमवार, दि.२७ जानेवारी २०२५ रोजी आयोजित सामूहिक विवाह समारोहामध्ये महाराष्ट्रासह देशभरातील अनेक राज्यांतून व विदेशातून आलेल्या ९३ जोडप्यांचा विवाह संपन्न झाला. महाराष्ट्राच्या ५८व्या वार्षिक निरंकारी संत समागमाची विधिवत सांगता झाल्यानंतर पिंपरीच्या मिलिटरी डेअरी फार्म ग्राउंडवरच या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

नव विवाहित वधू-वरांना सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी एकमेकांचा आदर-सत्कार करत प्रेमपूर्वक आणि भक्तिभावनेने कर्तव्यांचे पालन



करत जीवन व्यतीत करण्याचा आशीर्वाद प्रदान केला व त्यांना शुभेच्छा दिल्या. या सामूहिक विवाह सोहळ्या मध्ये पारंपरिक जयमाला तसेच निरंकारी विवाहाचे विशेष चिन्ह सांझा-हार (सामायिक हार) प्रत्येक जोडीच्या गळ्यामध्ये मिशनच्या प्रतिनिधींमार्फत परिधान केले. त्यानंतर आदर्श गृहस्थ जीवन जगण्याची शिकवण प्रदान करणाऱ्या निरंकारी लावांचे सुमधूर गायन करण्यात आले.

समारोहामध्ये सतगुरु माताजी व आदरणीय निरंकारी राजपिता रमितजी यांनी वधूवरांवर पुष्प-वर्षा करुन आपला दिव्य आशीर्वाद प्रदान केला. कार्यक्रमात उपस्थित वधू-वरांशी संबंधित कुटुंबीय आणि साध संगतने देखील पुष्प-वर्षा केला, निश्चितपणे हे एक अलौकिक दृश्य होते.

आजच्या या शुभ प्रसंगी महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, तेलंगना राज्ये आणि विदेशातून मिळून एकूण 93 जोडपी सहभागी झाली होती.

# विहीरीतील दूषित पाण्यामुळेच पुण्यात 'जीबीएस'

## नागरिकांना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळावे : आरोग्यमंत्री प्रकाश आबिकर यांचे निर्देश

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील गुइलेन बॅरे सिंड्रोमची रुग्णसंख्या १०१ वर पोहोचली आहे. आतापर्यंत आढळून आलेल्या रुग्णांपैकी ८० टक्के रुग्ण हे नांदेड परिसरात पाणीपुरवठा केल्या जाणाऱ्या विहिरीच्या परिसरातील आहेत. या विहिरीतील दूषित पाण्यामुळेच हे रुग्ण वाढल्याचे दिसून येत आहे, अशी माहिती आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सोमवारी दिली. नागरिकांना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळावे, यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देशही आरोग्यमंत्र्यांनी महापालिकेला दिले.




पुण्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस) रुग्णसंख्येत वाढ झाल्याच्या पार्श्वभूमीवर आरोग्यमंत्री आबिटकर यांनी सोमवारी आढावा घेतला. त्यांनी नांदेड परिसरातील पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी दीनानाथ मंगेशकर रुग्णालय आणि ससून सर्वोपचार रुग्णालयात दाखल असलेल्या जीबीएस रुग्णांची भेट घेऊन त्यांची विचारपूस केली. यानंतर आरोग्यमंत्र्यांनी सर्व शासकीय यंत्रणांची बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला. या बैठकीला विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महापालिकेचे आयुक्त राजेंद्र भोसले, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आणि आरोग्य विभागाचे संचालक डॉ. नितीन अंबाडेकर आदी उपस्थित होते.

या बैठकीनंतर बोलताना पत्रकार परिषदेत बोलताना आरोग्यमंत्री आबिटकर म्हणाले की, गेल्या काही दिवसांपासून पुण्यातील जीबीएसच्या रुग्णांमध्ये वाढ होत आहे. नांदेड परिसरातील विहिरीतून पाणीपुरवठा होत असलेल्या भागात ८० टक्के रुग्ण आढळून आले आहेत. विहिरीवर आच्छादन नसल्याने अथवा अन्य मार्गाने पाणी दूषित झाले असण्याची शक्यता आहे. त्यामुळे विहिरीतील दूषित पाण्यामुळे जीवाणू आणि विषाणूसंसर्ग होऊन त्यातून जीबीएसचे रुग्ण वाढल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे आमची प्राथमिकता रुग्णसंख्या वाढू न देण्यास आहे. रुग्णांची संख्या वाढू नये, यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश सर्व शासकीय यंत्रणांना देण्यात आले आहेत.

### राज्यात पिण्याच्या पाण्यासाठी नियमावली

» राज्यातील नागरिकांना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळण्याची गरज आहे. या दृष्टीने आरोग्य विभागाकडून नियमावली तयार केली जाणार आहे. नागरिकांना स्वच्छ पाणीपुरवठा करण्यासाठी सर्व यंत्रणांसाठी ही नियमावली आहे. यामुळे नागरिकांना भविष्यात दूषित पाणी मिळणार नाही आणि पर्यायाने त्यामुळे होणारे आजारही टाळता येतील, असे आरोग्यमंत्री आबिटकर यांनी स्पष्ट केले.

> पुण्यात जीबीएसची रुग्णसंख्या वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. जीबीएसचे रुग्ण राज्यात आधीपासून आढळतात. योग्य उपचारानंतर हे रुग्ण बरे होत आहेत. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाण्याची आवश्यकता नाही.
> - प्रकाश आबिटकर, आरोग्यमंत्री

# पिंपरी-चिंचवडमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा विविध उपक्रमांनी साजरा

## मराठी भाषा संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा प्रजासत्ताक दिनी करण्यात आला सन्मान

**पुणे | प्रतिनिधी**

मराठी भाषा संवर्धनाचे कार्य करणाऱ्या पिंपरी चिंचवड शहरातील व्यक्तींचा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त प्रजासत्ताक दिनी सन्मान करण्यात आला. पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळील मैदानावर हा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला.



मराठी भाषेचे संवर्धन व्हावे, मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर व्हावा, या हेतूने दरवर्षी १४ ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. यानिमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने मैत्री पुस्तकांशी, मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित करणारे सांस्कृतिक कार्यक्रम, डिजिटल साहित्य संमेलन, मराठी भाषा संवर्धनासाठी उपक्रम राबविणाऱ्या व्यक्तींचा सन्मान असे विविध उपक्रम राबवण्यात आले आहेत.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून महानगरपालिकेने पिंपरी चिंचवड शहरातील सोपान खुडे, सुरेखा कटारिया, नंदकुमार मुरडे, बाळकृष्ण माडगुळकर, संदीप तापकीर, डॉ.धनंजय भिसे, संदीप राक्षे, संजय पवार, अरुण बोऱ्हाडे, देवेंद्र गावडे आदींचा यावेळी सन्मान करण्यात आला. याप्रसंगी उप आयुक्त अण्णा बोदडे, आपत्ती व्यवस्थापन प्रमुख ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता अनुश्री कुंभार, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, दिव्यांग भवन फाऊंडेशनचे कार्यकारी अधिकारी परेश गांधी, माजी नगरसेवक मारुती भापकर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड यांनी केले. तर सूत्रसंचालन विकास गायकांबळे यांनी केले.

### गौरवमूर्तींना देण्यात आली भारतीय संविधानाची प्रत...

» भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षपूर्तीनिमित्त तसेच मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबवण्यात येत असून मराठी भाषा संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा प्रजासत्ताक दिनी सन्मान करताना त्यांना भारतीय संविधानाची प्रत देण्यात आली. याशिवाय भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणादायी संघर्षाची माहिती देणारे 'जग बदलणारा बापमाणूस' हे पुस्तकही यावेळी देण्यात आले.

> महापालिकेच्या वतीने 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा केला जात आहे. नुकताच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करताना मराठी भाषेतील संवाद अधिक वाढावा तसेच सर्जनशीलतेला वाव मिळावा यासाठी प्रयत्न केला जात आहे. या पंधरवड्यानिमित्त पिंपरी चिंचवड शहरातील मराठी भाषेचा प्रचार प्रसार करत मराठी भाषेच्या संवर्धनाचे काम करणाऱ्या व्यक्तींचा कार्याचा गौरव केला जात आहे.
> - किरण गायकवाड, विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# मुंबईत स्वबळावर, अन्य ठिकाणी मविआसोबत; महापालिका निवडणुकांबाबत राऊतांचं मोठं विधान

**महापालिकांमध्ये महाविकास आघाडी म्हणून आम्ही एकत्रित लढणार असल्याची घोषणा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते, खासदार संजय राऊत यांनी पिंपरी येथे केली.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुंबई महापालिका निवडणूक शिवसेना स्वबळावर लढणार आहे, मात्र राज्यातील इतर महापालिकांमध्ये महाविकास आघाडी म्हणून आम्ही एकत्रित लढणार असल्याची घोषणा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते, खासदार संजय राऊत यांनी) पिंपरी येथे केली.

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, पिंपरी-चिंचवड, खेड, आळंदी, आंबेगाव, जुन्नर आणि शिरूर येथील पक्ष संघटनेच्या आढावा बैठका त्यांनी घेतल्या. त्यानंतर खासदार राऊत पत्रकारांशी बोलत होते.

खा. राऊत म्हणाले की, देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईवर गेल्या अनेक वर्षांपासून शिवसेनेची पकड आहे. ही पकड कायम ठेवण्यासाठी मुंबईत स्वबळावर लढावे, अशी शिवसैनिकांची भावना आहे. त्यामुळे महाविकास आघाडी तुटली किंवा संपली असा अर्थ निघू शकत नाही. मुंबई सोडून राज्यातील इतर महापालिकांमध्ये महाविकास आघाडी म्हणून आम्ही निवडणुकीस एकत्रितपणे सामोरे जाणार आहोत.

ते म्हणाले की, एकनाथ शिंदे यांचे हायकमांड हे भाजप आहे. त्यामुळे भाजपने आदेश दिल्यानंतर त्यांना ते पद स्वीकारावे लागले. आपली कातडी वाचविण्यासाठी, स्वतःवरील खटले थांबविण्यासाठी ते उपमुख्यमंत्री झाले आहेत. मनोज जरांगे-पाटील हे मराठा समाजातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी लढत आहेत. भाजपकडून होणार्या आरोपांना उत्तर देण्यासाठी ते सक्षम आहेत. सरकारमध्ये मंत्री असलेल्यांकडून समाजात तेढ निर्माण होईल, अशी भाषा वापरली जात आहे.

आपल्या लोकांना सोडायचे आणि विरोधकांना पकडायचे यासाठी देवेंद्र फडणवीस गृहमंत्री म्हणून सक्षम आहेत, अशी मार्मिक टीकाही त्यांनी केली. तसेच, भाजप देशभरात इतर पक्ष फोडण्याचे कारस्थान करत असल्याचा आरोपही केला.

यावेळी सहसंपर्कप्रमुख आदित्य शिरोडकर, आमदार बाबाजी काळे, मावळ लोकसभा संघटक संजोग वाघेरे पाटील, समन्वयक केसरीनाथ पाटील, जिल्हाप्रमुख ॲड. गौतम चाबुकस्वार, अशोक खांडेभराड, शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले, महिला आघाडी जिल्हा संघटक सुलभा उबाळे, युवासेना शहर अधिकारी चेतन पवार, समन्वयक योगेश बाबर, विधानसभा प्रमुख धनंजय आल्हाट, तुषार नवले, विशाल यादव आदी उपस्थित होते.



### पदाधिकार्यांची बैठकीत तीव्र नाराजी

**» पिंपरी-चिंचवड शहरात, विधानसभेची एकही जागा न लढल्याने स्थानिक पदाधिकार्यांनी बैठकीत तीव्र नाराजी व्यक्त केली. पदाधिकार्यांना पाठबळ दिले जात नाही. संघटनेतील रिक्तपदे भरली जात नाहीत. संघटन वाढीसाठी गांभीर्याने लक्ष दिले जात नाही. महाविकास आघाडीसोबत महापालिका निवडणूक लढताना, अधिकाधिक इच्छुकांना संधी द्यावी. पक्षाने नमते घेऊ नये,स्थानिक पदाधिकार्यांना विश्वासात न घेता उमेदवार लादू नये, अशा तक्रारी नेते संजय राऊत, उपनेते रवींद्र मिर्लेकर, जिल्हा संपर्कप्रमुख आमदार सचिन अहिर यांच्या समोर मांडल्या.**

### बेरोजगारीबाबत श्वेतपत्रिका काढावी

**» राज्यात प्रचंड बेरोजगारी वाढली आहे. आयटी अभियंते बेरोजगार आहेत. हिंजवडी येथील राजीव गांधी माहिती व तंत्रज्ञाननगरीत पाच हजारांपेक्षा जास्त अभियंते नोकरीसाठी रांगेत थांबत आहेत. बेरोजगारीसंदर्भात श्वेतपत्रिका काढावी, अशी परिस्थिती असल्याचे खासदार राऊत म्हणाले.पिंपरीतील एकही जागा न लढल्याने बैठकीत खदखद शिवसेनेच्या स्थानिक पदाधिकार्यांनी यावेळी त्यांच्या तक्रारींचा पाढा नेत्यांसमोर वाचला.**

# पहिल्यांदा लक्ष, दुसऱ्यांदा रडारवर ; तिसऱ्यांदा चुकल्यास ‘करेक्ट कार्यक्रम’

**पोलिसांच्या आक्रमक धोरणामुळे शहरातील 630 गुन्हेगार रडकुंडीला; गुन्हेगारी नियंत्रणासाठी पोलिसांनी आक्रमक धोरण राबवले आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील गुन्हेगारी नियंत्रणासाठी पोलिसांनी आक्रमक धोरण राबवले आहे. दोनपेक्षा जास्त गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या सराईत गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्यात येत असून, त्यांना तडीपार, स्थानबद्ध किंवा महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अंतर्गत अटक करण्यात येत आहे. वर्षभरात 630 सराईत गुन्हेगारांना पोलिसांनी अक्षरशः रडकुंडीला आणले आहे.

#### अनपेक्षित दणका

मागील वर्षभरात तब्बल 630 सराईत गुन्हेगारांवर कारवाई झाली असून, यातील बहुतांश गुन्हेगार निर्ढावलेले आणि राजकीय वरदहस्त लाभलेले आहेत. आपण काहीही कृत्य केले तरी आपल्याला काहीच होणार नाही, या भ्रमात असलेल्या गुन्हेगारांना पोलिसांनी कठोर कारवाईतून धडा शिकवला आहे. अनेकांना तडीपार, स्थानबद्ध किंवा मोक्काअंतर्गत अटक करण्यात आले. या कठोर धोरणामुळे शहरात कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यात पोलिसांना मोठे यश मिळाल्याचे दिसून येत आहे.

#### दुसऱ्या गुन्ह्यानंतर रडारवर, तिसऱ्यांदा थेट कारवाई

पिंपरी - चिंचवड पोलिसांच्या धोरणानुसार, एखाद्या व्यक्तीवर दुसऱ्यांदा गुन्हा दाखल झाला, तर ती व्यक्ती थेट पोलिसांच्या रडारवर येते. त्यानंतर त्या व्यक्तीवर सतत लक्ष ठेवले जाते. त्या व्यक्तीवर तिसऱ्यांदा गुन्हा नोंदवला गेला, तर कोणत्याही संधीची वाट न पाहता थेट कठोर कारवाई करण्यात येते. या धोरणाचा उद्देश सराईत गुन्हेगारांना वारंवार गुन्हे करण्यापासून रोखणे आहे. या धोरणामुळे अनेक गुन्हेगारांनी धसका घेतल्याचे दिसत आहे.

#### गुन्हेगारांमध्ये भय

गेल्या वर्षभरातील कठोर कारवाईमुळे गुन्हेगारी वर्तुळात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक सराईत गुन्हेगारांनी आपले ठिकाण बदलले असून, काहींनी गुन्हेगारीच्या वाटेवरून माघार घेतली आहे. यामुळे शहरात सध्या शांततेचे वातावरण असून, गुन्ह्यांमध्ये घट झाल्याचे आकडेवारीवरून दिसून येत आहे.



### पोलिस आयुक्त आक्रमक

**» पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या नेतृत्वाखाली शहरातील गुन्हेगारांच्या नांग्या ठेचण्याचे काम सुरू आहे. चौबे यांनी आपल्या विभागांना स्पष्ट निर्देश दिले आहेत की, सराईत गुन्हेगारांबाबत कोणतीही दयामाया न ठेवता कठोर कारवाई केली जावी. स्थानबद्ध करणे, तडीपार करणे किंवा मोक्काअंतर्गत कारवाई करणे यांसारख्या कठोर कारवाईचा अवलंब करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत.**

### धडा घ्या, अन्यथा कारवाई...

**» पोलिस प्रशासनाने स्पष्ट संदेश दिला आहे की, कोणतीही व्यक्ती गुन्हेगारीत सहभागी होऊ नये. सहभागी झाल्यास दुसर्या गुन्ह्यानंतर पोलिसांच्या रडारवर याल आणि तिसर्या वेळेस कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल. यामध्ये कोणाचीही गय केली जाणार नाही.**

# ‘जीबीएस’ग्रस्त गावांना शुद्ध पाणी कठीणच?

## वाढीव कोटा मंजूर नसल्याने प्रश्न; महापालिका-जलसंपदा विभागात वाद

पुणे | प्रतिनिधी

‘गुइलेन बॅरे सिंड्रोम’चे (जीबीएस) संशयित रुग्ण आढळत असलेल्या आणि पुणे महापालिकेच्या हद्दीत नव्याने समावेश झालेल्या नरवीर तानाजी मालुसरे रस्त्यावरील (सिंहगड रस्ता) खडकवासला, किरकिटवाडी, नांदोशी, नांदेड या गावांमध्ये जलशुद्धीकरण केंद्रातून शुद्ध केलेल्या पाण्याचा पुरवठा करणे सध्या शक्य नसल्याचे स्पष्ट झाले आहे. धरणातून महापालिकेला वाढीव कोटा मंजूर होत नसल्याने या गावांना हे पाणी देणे शक्य नाही.

या गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या पाण्यामध्ये दूषित पाणी जात असल्याने नागरिकांना त्रास होत असल्याची तक्रार येथील रहिवाशांकडून केली जात असून,यागावांनाशक्य तितक्या लवकर महापालिकेच्या जलशुद्धीकरणातून शुद्ध केलेले पाणी द्यायला हवे, अशी शिफारस पाणी तपासणाऱ्या प्रयोगशाळेने केली आहे.




### जीवाणूसह विषाणू संसर्ग

» आरोग्य विभागाने शीघ्र प्रतिसाद पथक स्थापन केले आहे. या पथकाने रुग्णसंख्या जास्त असलेल्या भागांची पाहणी सुरू केली आहे. रुग्णांचे शौचनमुने आणि रक्तनमुने राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेत पाठविण्यात येत आहेत. यातील काही रुग्णांचे तपासणी अहवाल आरोग्य विभागाला मिळाले असून, कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी आणि नोरोव्हायरसचा संसर्ग आढळून आला आहे. याचबरोबर पुण्यातील विविध भागांतील पाण्याचे नमुने रासायनिक आणि जैविक तपासणीसाठी राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले आहेत.

महापालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या नागरिकांना शुद्ध पाणी मिळावे, यासाठी पाणीपुरवठा योजना राबविण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे. त्यासाठीचा आराखडादेखील महापालिकेने तयार केला आहे. त्यासाठी आवश्यक असलेला खर्चदेखील करण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे. मात्र, या गावांना पाणी पुरविण्यासाठी महापालिकेला खडकवासला धरणातून अतिरिक्त पाणी उपलब्ध होणे गरजेचे आहे. त्यासाठीची मागणी यापूर्वीच महापालिकेने जलसंपदा विभागाकडे केली आहे. मात्र, त्यावर अद्याप कोणताही निर्णय न झाल्याने या गावांमधील पाणीपुरवठा योजना रखडणार आहे.

### ‘दहा गावांसाठी वाढीव पाणी मिळावे’

» खडकवासला, किरकिटवाडी यासह दहा गावांमधील नागरिकांना पाणी देण्यासाठी सध्या पालिकेला मिळत असलेल्या पाण्यामध्ये २५ एमएलडी वाढीव पाणी मिळावे, अशी मागणी महापालिकेने जलसंपदा विभागाकडे केली आहे. मात्र, त्यावर अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. महापालिकेच्या हद्दीत आलेल्या गावांना शुद्धीकरण केलेले पाणी देता यावे, यासाठी खडकवासला धरणाच्या क्षेत्रातील जलसंपदा विभागाची जागा जलशुद्धीकरण केंद्रासाठी मिळावी, अशी मागणीदेखील महापालिकेने यापूर्वी केली असल्याचे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले. पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप म्हणाले, खडकवासला धरणाच्या आजूबाजूच्या १० गावांसाठी जलशुद्धीकरण प्रकल्प प्रस्तावित आहे. त्याचा आराखडा करण्यात आला आहे. मात्र, त्यासाठी आवश्यक पाणी नसल्याने तो मागे ठेवण्यात आला होता. सध्या या गावांची गरज लक्षात घेता हा प्रस्ताव पुन्हा मान्यतेसाठी ठेवला जाणार आहे. तसेच, शासनाकडे जादा पाण्यासाठी पुन्हा एकदा मागणी केली जाणार आहे.

समाविष्ट गावांमध्ये पाणीपुरवठा करण्यासाठी पहिल्या टप्प्यात सूस-म्हाळुंगे येथे जलवाहिनी व टाक्या बांधल्या जातील. त्यानंतर बावधन भागात काम करून थेट पाणीपुरवठा केला जाणार आहे. त्याचप्रमाणे लोहगाव-वाघोली या टप्प्याचेही काम सुरू आहे. या सर्व समाविष्ट गावांमध्ये टप्प्याटप्प्याने पाणीपुरवठ्याची योजना राबविली जाणार असून, यासाठी किमान ५०० कोटींपेक्षा अधिक खर्च अपेक्षित आहे, असे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले. लोहगाव-वाघोली पाणी योजनेसाठी पाण्याच्या वाढीव कोट्याला मान्यता देण्यात आली आहे.

# शिरूर शहरात होतेय वायू प्रदुषण ! ‘कचरा जाळणी थांबवा अन्यथा...’; मनसेचा कडक इशारा

## परिसरात मोठ्या प्रमाणावर वायू प्रदूषण होत असून, नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाला आहे.

पुणे | प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून शिरूर नगरपरिषदेकडून शहरातील घनकचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्याऐवजी बेकायदेशीरपणे कचरा जाळण्यात येत असल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. या प्रकरणामुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर वायू प्रदूषण होत असून, नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाला आहे.



कचऱ्याचे असे जाळणे पर्यावरण संरक्षण कायद्याच्या स्पष्टपणे विरोधात आहे. कचरा व्यवस्थापनासाठी ठरवलेल्या शास्त्रोक्त पद्धतींची अंमलबजावणी करण्याऐवजी नगरपरिषद बेकायदेशीर मार्गाने कचरा जाळत असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. यामुळे शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी आणि नागरिकांना श्वसनाच्या समस्या, ॲलर्जी, फुफ्फुसाच्या आजारांसारख्या गंभीर आजारांना सामोरे जावे लागत आहे. शिरूर नगरपरिषदेकडून कायद्याचा भंग करून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ केला जात आहे. प्रशासनाच्या या हलगर्जीपणामुळे नागरिकांमध्ये नाराजी असून, संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी केली जात आहे.

### मनसेचा इशारा

» जर या प्रकरणाची त्वरित चौकशी करून नगरपरिषदेस योग्य ती कारवाई करण्यास भाग पाडले नाही, तर मनसे ची लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशारा मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष महिबुब सय्यद, शिरूर प्रवासी संघाचे अध्यक्ष अनिल बांडे, मनसेचे तालुका संघटक अविनाश घोगरे, मनसेचे शहराध्यक्ष आदित्य मैड, मनसेचे शिरूर सचिव रवि लेंडे यांनी दिला आहे.

### कायद्याचा भंग आणि प्रशासनाचा निष्काळजीपणा

» पर्यावरण संरक्षण कायद्यानुसार कोणत्याही प्रकारचा कचरा जाळण्यावर बंदी घालण्यात आलेली आहे. तरीही शिरूर नगरपरिषदेकडून या कायद्याचा भंग करून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ केला जात आहे. प्रशासनाच्या या हलगर्जीपणामुळे नागरिकांमध्ये नाराजी असून, संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी केली जात आहे.